
# भारतीय संगीताचे ऐतिहासिक अवलोकन

## Chapter- 1




आजच्या आधुनिक युगातील हिंदुस्थानी संगीताचे वैशिष्ट्य रागगायन आहे. राग याचा अर्थ भाव. राग या शब्दाची उत्पत्ती 'रंज' या धातुपासून झाली आहे. रंज म्हणजे रिझविणे, मनाला आनंद देणे, सुखकर वाटणे. राग ही स्वरांची अशी विशिष्ट रचना असते की, जी लोकांचे रंजन करते, लोकांच्या हृदयाला आनंद देते. म्हणूनच 'रंजयति इति रागः' असे म्हणतात.

पंडित भातखंडे यांनी आपला ग्रंथ श्रीमल्लक्ष्यसंगीतम यामध्ये रागाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे -

योऽयं ध्वनिविशेषस्तु स्वर वर्ण विभूषितः।
रंजको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः॥

अर्थात् स्वर व वर्ण यांनी युक्त असा विशिष्ट ध्वनिसमूह जो रंजक म्हणजे मनाला आनंद देणारा असतो, त्याला राग असे म्हणतात.




ज्या रागगायनांच्या अंतर्गत ज्या बंदिशी सादर केल्या जातात त्यातील एक रचना 'ख्याल' ही आहे. त्यालाच खयाल असेही म्हणतात. आजच्या अभिजात संगीतात किंवा रागदारी संगीतात या ख्यालगायनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना आज, अभिजात संगीत किंवा रागदारी संगीत म्हणजेच ख्यालगायन, असे म्हटले तर कदाचित ती चूक होणार नाही.

खयाल किंवा ख्याल याचा अर्थ कल्पना (Imagination) प्रत्येक कलाकार आपल्या प्रतिभाशक्तीने, कल्पनाशक्तीने हे ख्याल गायन मांडत असतो. तो अनेक प्रकारच्या अलंकार, गमकादि प्रयोगाने आपले ख्यालगायन परिपूर्ण व सुदृढ करण्याचा आणि त्यातून सौंदर्याविष्कार निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. ख्यालगायन याचा अर्थ आपण 'कल्पना संगीत' असाही घेऊ शकतो.

ख्यालगायनाची व्याख्या करणे जरी कठीण असले तरी ती अशी करता येईल की, राग नियमांचे पालन करून, लोकांना आवडेल व रूचेल अशी मांडलेली सांगीतिक कल्पना म्हणजेच ख्यालगायन होय." आता या विधानावरून आपल्याला असे लक्षात येईल की, प्रत्येकाची प्रतिभाशक्ती आणि कल्पनाशक्ती ही एकसारखी नसते. याचाच अर्थ असा की प्रत्येकाचे ख्यालगायन वेगवेगळे होणार. म्हणजेच "व्यक्ति तितक्या प्रकृति."

परंतु आपण आपल्या दैनंदिन जीवनात पाहतो की, प्रत्येक व्यक्तिच्या समोर कोणत्या ना कोणत्या व्यक्तिचा आदर्श असतो. आणि हा आदर्श ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत आवडीप्रमाणे असतो. उदा० एखादयाच्या डोळ्यासमोर एखादया श्रेष्ठ गायकाचा आदर्श असतो, तर एखाद्याला चित्रकाराचे आकर्षण असते, तर आणखी एखाद्याला स्वामी विवेकानंदांसारख्या थोर व्यक्तिबद्दल अपार आदर असतो व तोच त्याचा आदर्श असतो.




प्रत्येक व्यक्तिसमोर एखाद्या विशिष्ट व्यक्तिचा आदर्श असल्यामुळे त्या विशिष्ट व्यक्तिचा प्रभाव कळत नकळत त्या व्यक्तिवर पडत असतो. त्यामुळे ती व्यक्ती त्या विशिष्ट व्यक्तिचे अनुकरण करू लागते. अगदी पोषाखापासून ते बोलण्या चालण्यापर्यंतच्या सगळ्या लकबी आत्मसात करून तसेच राहण्याचा प्रयत्न करते. उदा० राजकपूरच्या अभिनयावर पडलेला चार्ली चॅपलीनचा प्रभाव. किंवा देवानंदवर ग्रेगरी पेकचा. मग अशा वेळेस दुसऱ्या कोणत्याही व्यक्तिने त्या व्यक्तिला म्हटले की, तुमच्यात आणि त्या विशिष्ट व्यक्तीत फारच साम्य आहे, तर त्या व्यक्तिला देखील मानसिक समाधान मिळते.

आणि नेमकी अगदी हीच गोष्ट संगीतामध्येही घडते. कशी, ते पाहू. ख्याल म्हणजे कल्पना. पण तरीही बरेच वेळा एखादी कल्पना सुचण्यासाठी कोणाचे तरी अनुकरण करावे लागते. आता कोणाचे अनुकरण केले म्हणजे साहजिकच त्या व्यक्तिकडे गुरूत्वं जाते. कलेच्या प्रांतात ती व्यक्ती

कलाकारच असते. म्हणजे साहजिकच आपण त्या व्यक्तिचे - कलाकाराचे शिष्य ठरतो. यामधूनच 'गुरू-शिष्य' हे नातं जन्माला येतं. असे अनेक शिष्य त्या कलाकाराला लाभतात. व त्यांचा छोटासा परिवार निर्माण होतो. आणि याच परिवाराला "घराणे" असे म्हणतात. आता घराणे म्हणजे नेमके काय हे लक्षात येईल. पण आज ज्याला आपण घराणे असे म्हणतो त्याच्या आधी काही शाखा किंवा शैली प्रचारांत होत्या काय? तसेच राग गायनाच्या आधी कोणते गायन अस्तित्वात होते? आणि ख्यालगायनाच्या आधी कोणते गीतप्रकार प्रचलित होते? असे निरनिराळे प्रश्न आपल्या मनांत निर्माण होतात. आणि त्यांच्या उत्तरासाठी, उत्तर हिंदुस्थानी संगीताच्या इतिहासावर ओझरता दृष्टिक्षेप टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

भारत ही एक तपोभूमी मानली जाते. भारतीयांना पूर्वजांच्या थोरवीचा अतिशय अभिमान आहे - आदर आहे. भारतीय लोक इतर देशातील लोकांपेक्षा अधिक भावुक व गुणोपासक मानले जातात. याचाच परिणाम म्हणजे भारतातील साहित्य व ललित कला उच्च ठरल्या आहेत. याशिवाय भारतीयांच्या प्रत्येक विषयाला - कलांना सुद्धा तत्त्वज्ञानाची व धार्मिक अधिष्ठानाची बैठक लाभलेली आहे.




भारतीय आर्यांच्या चौदा विद्या व चौसष्ठ कला सर्वश्रुत आहेतच. या चौसष्ठ कलांपैकी ललित कला शाखेत संगीत - नाट्य - चित्र - शिल्प या कलांचा समावेश होतो. ललित कला सर्वसाधारणपणे मोहक व मनोवेधक असतात. चित्र - शिल्प - नाट्य या कलांसाठी मानवी मनाची आवड व मनाचा कल यांची आवश्यकता असते; परंतु संगीत ही कला मानवांनाच नव्हे तर पशुपक्ष्यांनाही आकृष्ट करिते. श्रीकृष्णाच्या बांसरीच्या नादानं गाई वासरांनी, पशुपक्ष्यांनी श्रीकृष्णाजवळ गोळा होणं, गोपगोपींनी आपला कामधंदा विसरून श्रीकृष्णाकडे धाव घेणं किंवा बैजू बावराच्या गाण्यानं पशुपक्ष्यांनी आकर्षित होणं, अशी अनेक

उदाहरणे देता येतील. एवढेच नव्हे तर वनस्पतींवर सुद्धा संगीताचा प्रभाव पडतो, असे विज्ञान आपल्याला सांगते. याचे कारण नादमाधुर्य व नादातील नैसर्गिक मोहकता.

## कलेच्या निर्मितीची कारणे-

संपूर्ण प्राणिमात्रांत मनुष्य हा श्रेष्ठ प्राणी आहे. तो बुद्धिजीवी आहे. विवेकयुक्त सारासार विचार करण्याची शक्ती त्याला आहे. त्यामुळे तो आपल्या भावना व विचार, कंठ आणि हावभाव यांच्या सहाय्याने व्यक्त करू शकतो. स्वतःला जाणवणारे जीवनाचे कोणतेही रूप, दुसऱ्याला समजेल अशा माध्यमात, कोणत्या ना कोणत्या रूपात व्यक्त करणे ही मानवाची गर्भापासूनच मूलभूत प्रवृत्ती आहे. मनुष्य जेव्हा स्वाभाविक आनंदाने किंवा दुःखाने आपल्या मनातील भाव प्रगट करण्याची इच्छा व्यक्त करतो, तेव्हा त्याचा कलाक्षेत्रात प्रवेश होतो. व त्यापासून निरनिराळ्या कलाकृती जन्माला येतात. यावरून आपण असे म्हणू शकतो, की मनुष्याच्या जन्माबरोबरच कला निर्माण झाल्या असल्या पाहिजेत.




मनुष्य आपल्या गरजा भागविण्यासाठी बुद्धीचा उपयोग करू लागला. आत्मसंरक्षणासाठी त्याने शस्त्रास्त्रे बनवायला सुरुवात केली. अशा रीतीने शस्त्र कलेची वाढ झाली. व याच क्रमाने वस्त्रांची व गृहरचनेची कला त्याने आत्मसात केली. एकंदरीत आपले जीवन जास्तीत जास्त सुखमय होण्यासाठी तो जसजशी आपली बुद्धी खर्च करू लागला, तसतशा अनेक भौतिक कला निर्माण होत गेल्या. जीवनाकरता उत्पन्न झालेली कला सहेतुकच असणार. त्या कलांपासून मिळणारा आनंद हा क्षणभंगुर असतो, टिकाऊ नसतो. कलेचा मुख्य परिणाम आनंद आहे. त्यामुळे मानवाने मनाला, आत्म्याला आनंद देणाऱ्या निरनिराळ्या ललित कला निर्माण केल्या. कारण कोणत्याही

गोष्टीचा आनंद घेणे हा आत्म्याचा गुण आहे. आनंदाचे क्षणिक व टिकाऊ असे दोन प्रकार आहेत. त्या प्रकारांवरून आपण कलेचे दोन वर्ग करू शकतो. एक आधिभौतिक व दुसरा आध्यात्मिक.

मनुष्याच्या प्रापंचिक गरजा भागविणारी कला हा पहिला प्रकार. यात वास्तुकला, पाककला, शिवणकला इत्यादी जीवनास आवश्यक असणाऱ्या कला येतात. या कलांपासून मिळणारा आनंद हा क्षणिक असतो.

जड भूमीवरून उच्च वातावरणात नेऊन सोडून सौंदर्यदर्शनाने अंतरात्म्याला प्रसन्न व आल्हादित करणाऱ्या कला या दुसऱ्या प्रकारात मोडतात.



पहिल्या प्रकारच्या कलांना जरी कला ही संज्ञा दिली, तरी साधारणतः आधिभौतिक किंवा सामान्य कला या अर्थानेच द्यावी लागेल. दुसऱ्या प्रकारच्या कलांना मात्र ललित कला किंवा आध्यात्मिक कला अशी संज्ञा द्यावी लागेल.

इतर सामान्य कलांच्या तुलनेत ललित कलांचा क्रमांक वरचा लागतो. ललित कला म्हणजे भावना व्यक्त व उद्दीपित करण्यासाठी व प्रत्यक्ष उपभोगाची दृष्टी न ठेवता केवळ चिरकालीन व निरपेक्ष आनंद पुष्कळांना प्राप्त करून देण्यासाठी अधिकाधिक उत्तम केलेली मनुष्याची उत्तमोत्तम कृती होय.

ललित म्हणजे सुंदर. ललितकला म्हणजे सौंदर्याची अनुभूती करून देणारी कला. यावरून स्पष्ट होईल की, सौंदर्य प्राप्त करून देणे व त्या सौंदर्याद्वारे आल्हाद उत्पन्न करणे, हे ललित कलांचे कार्य होय. ललित कलांपासून मिळणारा आनंद अंतरेंद्रियांना होतो; व तो टिकाऊ असतो. तो प्रथम मनाला होऊन नंतर अंतःकरणाला व शेवटी आत्म्याला जाऊन पोहचतो. ज्या कलेत भौतिक सामग्री कमी व भाव प्रदर्शन जास्त, ती कला श्रेष्ठ मानली जाते. या दृष्टीने संगीत


कला ही श्रेष्ठच मानली जाते. म्हणूनच संगीताला 'कलांची कला' असे म्हणतात.

या ललित कलांमध्ये पुढील पांच कलांचा समावेश होतो. वास्तु, शिल्प, चित्र, काव्य व संगीत (गीत, वाद्य, नृत्य). या ललित कलांद्वारे मनुष्य आपल्या भावना व्यक्त करतो. म्हणूनच संगीताला 'पंचम वेद' किंवा 'गांधर्व वेद' असेही संबोधिले जाते.

संगीतात गीत, वाद्य व नृत्य या तीनही कलांचा समावेश होतो. याबद्दल 'संगीत रत्नाकरात' संगीत कलेच्या संदर्भात एक श्लोक दिला आहे.

"गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते।"

या तीनही कला एकमेकांपासून वेगळ्या आहेत, स्वतंत्र आहेत. या स्वतंत्र असूनही एकमेकांच्या आश्रयीत आहेत. गायनाच्या आधीन वादन, तर वादनाच्या आधीन नृत्य आहे.



संगीताच्या उत्पत्तीबद्दल निरनिराळी मते-


संगीत ही कला केव्हा निर्माण झाली हे सांगणं कठीण असलं तरी संगीताने मनुष्य जीवनात त्याच्या जन्माबरोबरच प्रवेश केला असे म्हणावेसे वाटते. कारण लहान मुलाला आई अंगाईगीत गाऊन झोपविते किंवा निरनिराळे आवाज करून खेळविते व बाळही त्या नादाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करते. म्हणजे संगीत हे मनुष्याच्या ठिकाणी उपजत असले तरी सुदधा संगीत ही कला म्हणून केव्हापासून मान्यता पावली - तिचा विकास कसा झाला या बाबतीत विद्वानांमध्येही बरेच मतभेद आहेत. कारण ज्या दृष्टिकोनातून आपण संगीताचा विचार करू त्या दृष्टिने आपल्याला संगीताची उत्पत्ती झालेली दिसेल. स्वाभाविकच संगीताच्या उत्पत्तीबद्दल विद्वानांची भिन्न-भिन्न मते आहेत.

① संगीत अनादी आहे. ते मानव-निर्मित नाही. पृथ्वीतलावर ज्या वेळी मानवाचा जन्म झाला, त्याचवेळी संगीत ही निर्माण झाले, असे एक मत.

② ब्रह्मवैवर्तपुराणात ब्रह्म हा आदिपुरुष. ब्रह्माला विश्वनिर्माता मानून, त्याच्याचकडून संगीताची उत्पत्ती झाली असे मानतात.

③ ऐतिहासिक दृष्ट्या संगीत हे सामवेदांतून निर्माण झाले, असे मानतात. या दृष्टीने संगीताच्या इतिहासाचे वैदिक संगीत, गांधर्व संगीत, रत्नाकर संगीत व लक्ष्यसंगीत असे चार कालखंड मान्य आहेत.

④ संगीत हे भाषाशास्त्रापूर्वी जन्माला आले असावे, याबद्दल सर्व भाषा शास्त्रज्ञांत एकमत आहे. 'Music is a language of emotions' (संगीत ही भावनांची भाषा आहे.) भाषा अस्तित्वात येण्यापूर्वी हावभावांची भाषा होती. ती जेव्हा मर्यादित वाटू लागली, तेव्हा संगीताचा जन्म झाला असावा.



संगीताच्या उत्पत्तीबद्दल जरी निरनिराळी मते प्रचलित असली तरी आज संगीत हे सामवेदातूनच निर्माण झाले आहे, हे ऐतिहासिक सत्य ठरले आहे.

संगीताचे अस्तित्व मनुष्याच्या उत्पत्तीदिनापासूनच मानतात. भारतीय प्राचीन इतिहास इ. स. पूर्व ३५०० वर्षे सुरू होतो. पण यापूर्वीही ज्याला अंधकार युग म्हणता येईल, अशा काळांत काही वाद्ये अस्तित्वात होती. या अंधकार युगाचे चार भाग पडतात. ते खालीलप्रमाणे —

**पूर्व पाषाणकाळ** – हा काळ म्हणजे मनुष्याच्या जंगली अवस्थेचा काळ. या काळातील मनुष्याला आदिमानव म्हणत. यांच्याजवळ एक प्रकारचे पाषाण वाद्य होते, त्याला अग्सा म्हणत या काळातील गाणे हे हा हा हू हू याप्रकारचे होते.


**उत्तर पाषाणकाळ** – या काळात मानव समूहाने राहू लागला होता. नदीकाठी चिमण्या पक्षी चिवचिवाट करीत. त्यावरूनच सामूहिक गीतांच्या प्रेरणेचा जन्म झाला असावा.

**ताम्रकाळ** - या काळात तांब्याची हत्यारे होती म्हणून या काळाला ताम्रकाळ हे नांव पडले. या काळातील लोकांनी संगीताला प्रथम ईश्वरोपासनेचे साधन बनविले. आर्यांच्या संगीतावर या युगातील संगीताचा प्रभाव दिसून येतो.

**लोहकाळ** - या काळातील लोकांनी लोखंडाची हत्यारे बनविली. या काळातील स्त्रिया, पायांत लोखंडी घुंगरू बांधून नृत्य करीत.[1]

## संगीताचा ऐतिहासिक कालक्रम व त्याचे विभाजन-

### वैदिक काळ-



हा काळ इ.स. पूर्व २००० ते १००० पर्यंतचा मानतात. भरतखंडातील संगीताइतके प्राचीन संगीत जगांत दुसरे कोणतेच नाही. संगीताच्या खऱ्या इतिहासाचा काळ इथूनच सुरू होतो. कोणत्याही कलेचा इतिहास पाहतांना तिचे उगम स्थान पाहणे अतिशय महत्त्वाचे असते. भारतीय संगीतकलेचे उगमस्थान जगातील सर्व संगीत कलांच्या उगमस्थानापेक्षा प्राचीन आहे.

वैदिक वाङ्मय हे जगांत प्राचीन मानले जाते. आर्यांचे वेद हे जगांतील आद्यवाङ्मय आहे. त्याचे पिढ्यानुपिढ्या जतन व्हावे, म्हणून लेखन कलेच्या अभावी मुखोद्गत करून ते जिवंत ठेवण्याची प्रथा आर्यांनी पाडली. सामांचे म्हणजे वैदिक ऋचांचे, गान रूपाकडे किंचीत झुकलेले पठण हेच भारतीय संगीतकलेचे उगमस्थान होय.

ऋषि-मुनींनी ऋचांच्या संगीतमय पारायणाने सामगानाचा प्रथम विकास केला. यावर एका कवीने सुंदर कल्पना केली आहे.

'प्रथम साम - रव नव तपोवने'


---

१. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी, पृ. क्र. ४५ ते ५१

म्हणजे जेव्हा भारतमातेच्या ज्ञान आकाशात, ज्ञानमंदिरात निर-निराळ्या विद्यांचा सुरम्य, प्रसन्न उषःकालाप्रमाणे प्रकाश दिसू लागला, त्याच वेळेपासून ऋषींच्या तपोवनांमध्ये साम-गानाचे स्वर ऐकू येऊ लागले.

## वैदिक साम संगीत-

वैदिक वाङ्मयाचा प्रधान विषय यज्ञधर्म हा आहे. संगीताचे संवर्धन व पोषण यज्ञसंस्थेने केले. वैदिक मंत्रवाङ्मयांत ऋक्, यजुः, साम व अथर्व यांचा समावेश आहे. यांपैकी छंदोबद्ध पद्यात्मक वाङ्मयास ऋक् - ऋचा म्हणतात. ऋचा म्हणजे ठराविक अक्षरांनी युक्त पाद किंवा चरण. यांच्या जुळणीत नियमबद्धता असते. अनियमित वाक्यरचनेने युक्त ते यजुः होय. स्वरांच्या सहाय्याने म्हटलेल्या आलापयुक्त ऋचा म्हणजे 'सामगायन'. ऋक्, यजुः व साम यांनाच व्यास महर्षींनी ऋग्वेद, यजुर्वेद, व सामवेद म्हटले आहे. सामवेद पाठ्य व गेय असा द्विरूप आहे.




सामसंगीताची पीठिका म्हणजे अग्निपूजा किंवा यज्ञ हीच होय. आर्यांच्या नित्य व्यवहारात अग्नीचे रात्रंदिवस पालन करणे ही गोष्ट फार महत्त्वाची होती. त्यामुळे साहजिकच आर्यांच्या मनात अग्निबद्दल आदर व पूज्यता निर्माण झाली. आणि अग्नि-परिपालन या गोष्टीला आर्य धर्मात अग्रस्थान प्राप्त झाले. या अग्निपूजेतूनच यज्ञाचे व्यवस्थित स्वरूप पुढे निर्माण झाले. यज्ञाच्या आरंभी वैदिक ऋचा गीतासारख्या गाण्याची प्रथा आर्यांनी यज्ञकर्मात पाडली. या गेय वैदिक ऋचांना 'साम' म्हणत. ही सामगीते आणि त्यांच्या गायन पद्धतीचे शास्त्रीय गान यांना मिळून सामगायन हे नांव मिळाले. हे सामगायन ऋत्विजांकडून होई. हे गायन करणारे ऋत्विज तीन असत: एक मुख्य व दोन साथीदार.

# सामगानातील स्वरयोजना

साम हजारो प्रकारचे होते. प्रत्येक साम वेगवेगळ्या आरंभक स्वरांनी गाइले जात. सामगानातील सप्तस्वर संवादसिद्ध आहेत. या सप्त स्वरांची नावें – क्रुष्ट प्रथम; द्वितीय; तृतीय; चतुर्थ; मंद्र किंवा पंचम आणि षष्ठ किंवा अतिस्वार्य या प्रकारे होती.

प्राचीन व प्रचलित गायनांत, शास्त्रात सप्त शुद्ध स्वरांचा उपयोग जसा केला जातो, तद्वत प्राचीन सामगानांतही तो होत असे. गायकी पद्धतीत सप्तस्वर सा रे ग म प ध नी असे आरोही क्रमाने घेतले जातात. सामगानात हेच स्वर वेगळ्या नावाने, थोड्या फरकाने अवरोही योजिले जातात. ते असे – क्रुष्ट, प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, मंद्र व अतिस्वार्य. सामगानात हे स्वर अक्षराच्या माथ्यावर १-२-३-४-५-६-७ या अंकांनी दर्शविले जातात. वैदिक संगीतात ते उतरत्या क्रमाने वापरले जातात. या अवरोही कृतीला 'विधानकृती' असे म्हणतात.



पंडित गो. भि. आचरेकर यानी मांडिलेली पद्धती–

हिंदी स्वर – म ग रे सा नी ध प

सामस्वरांक – १ २ ३ ४ ५ ६ ७

या पद्धतीत सामस्वरांच्या अंकातील क्रम जरी चढता आहे, तरी स्वर अवरोही आहेत. ते याच क्रमाने घ्यावयाचे असतात.[१]

'माण्डूकी शिक्षा' या ग्रंथात अशी माहिती मिळते की, सामगानांत केवळ तीनच स्वर असत. त्यांची नावें उदात्त, अनुदात्त व स्वरित. पुढे एकेका स्वराची वाढ होत गेली व वैदिक कालांतच सामगान सप्तस्वरांत होऊ लागले.

"सप्त स्वरास्तु गीयन्ते सामभिः सामगैर्बुधैः।"

माण्डूकी शिक्षा

---


१. भारतीय संगीत व संगीतशास्त्र – बा. गं. आचरेकर, पृ. क्र. १९७-१९८.

'पाणिनी शिक्षा व नारदी शिक्षा' या ग्रंथात पुढील श्लोक आहे.

उदात्ते निषादगान्धारावनुदात्त ऋषभधैवतौ।
स्वरितप्रभवा ह्येते षड्जमध्यमपंचमाः॥

याचा अर्थ असा की, उदात्त म्हणजे गांधार व निषाद, अनुदात्त म्हणजे रिषभ आणि धैवत. तसेच स्वरित म्हणजे षड्ज, मध्यम, पंचम.

सामगायन हे लयबद्ध असे. म्हणजे ह्रस्व आणि दीर्घ अक्षरांनी असलेल्या लयीने युक्त होते. हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार, निधन असे सामगानाचे पांच भेद होत. पुढील कालांत म्हणजे धृपदगान पद्धतीत हिंकार म्हणजे नोमतोम्, प्रस्ताव म्हणजे स्थायी, उद्गीथ म्हणजे अंतरा, प्रतिहार म्हणजे संचारी, निधन म्हणजे आभोग, असे पांच प्रकार झाले.




सामगायन विशेषतः यज्ञप्रसंगी होत असे. यज्ञांची समाप्ती देखील सामगायनानेच होत असे. धार्मिक प्रसंग, यज्ञ इत्यादी धार्मिक संस्कारांशी संबंधित असल्यामुळे सामसंगीत लौकिक गायनान्तर्गत येऊ शकत नाही.

गायनाबरोबर वाद्यसंगीतही असे. अर्थात गायनाबरोबर वाद्यांची साथ असे. वैदिक काळात वीणा, दुन्दुभि, भूमिदुन्दुभि, वेणू इत्यादी वाद्यांचे उल्लेख आढळतात.

यानंतरचा काळ प्राचीन काळ म्हणून संबोधण्यात येतो. ह्या काळी संगीताचे दोन प्रकार सांगितले, एक मार्गी संगीत व दुसरे देशी संगीत. ह्या संगीताच्या प्रकाराबद्दल विस्तृत माहिती पंडित शार्ङ्गदेव यांच्या "संगीत रत्नाकर" या ग्रंथात मिळते. त्यावरून मार्गी संगीत व देशी संगीत हे दोन प्रकार आपणांस जास्त स्पष्ट होतील.

डॉ. शरच्चन्द्र परांजपे यांनी आपले मत असे व्यक्त केले आहे की, "भारतीय संगीताच्या आरंभीच्या अवस्थेमध्ये 'साम संगीत' हेच मार्गी संगीत होते. व 'गांधर्व संगीत' हेच देशी संगीत होते. वैदिक युगात साम व गांधर्व या दोन्ही परंपरा एकमेकां-पासून वेगळ्या राहिल्या. 'साम' हे वैदिक महर्षींचे संगीत होते.

तर 'गांधर्व' हे संगीत व्यवसाय करणारे गांधर्व यांचे संगीत होते. वैदिक युगामध्ये गांधर्वांना संगीतप्रिय क्षुद्र देवता मानले आहे. सामपरंपरेशी यांचा संबंध दिसत नाही. सामगायन करणाऱ्या आचार्यांच्या परंपरेत गांधर्वांचा उल्लेख मिळत नाही. यावरून असे स्पष्ट होते, की हे तत्कालीन देशी संगीताचेच प्रतीनिधीत्व करीत असले पाहिजे. रामायण व महाभारताच्या काळापर्यंत गांधर्वगायनाचा समावेश मार्गी संगीतांतर्गत होऊ लागला. लव-कुशांद्वारे रामायणगायन सार्वजनिक रूपात प्रस्तुत केले गेले व ते गायन तत्कालीन संगीत आचार्यांना मान्य झाल्यामुळे त्याला मार्ग संगीत म्हटले गेले.[1]



पंडित शार्ङ्गदेवांनी संगीत रत्नाकराच्या प्रथम अध्यायात मार्गी व देशी संगीताचे खालीलप्रमाणे वर्णन केले –

मार्गो देशीति तद्द्वेधा तत्र मार्गः स उच्यते।
यो मार्गितो विरिञ्च्याद्यैः प्रयुक्तो भरतादिभिः॥

अर्थात ब्रह्मदेवाने जे [illegible] शोधून काढले; आणि जे भरतादि मुनींनी प्र[illegible] गाइले ते मार्गी संगीत होय.

देशे देशे जनानां यद्रुच्या हृदयरञ्जकम्।
गीतं च वादनं नृत्यं तद्देशीत्यभिधीयते॥


अर्थात लोकांच्या अभिरूचीनुसार जे संगीत गाइले जाते, ते देशी संगीत होय. ते मानवाने आपल्या बुद्धिसामर्थ्याने निर्माण केले.

संगीत रत्नाकरावर चतुर कल्लिनाथ यांची टीका आहे. त्यात त्यांनी मार्गी व देशी संगीताची फोड करून सांगितली, ती पाहू- 'यो मार्गितो विरिञ्च्याद्यैः।' यावर टीका करताना कल्लिनाथाने म्हटले की, 'मार्गित्वानमार्गः चतुर्षु वेदेष्वन्विष्य कृतत्वात।' मार्ग या शब्दाचा अर्थ 'शोधणे' असा होतो. म्हणजेच चारी वेदांतून शोधून ज्या संगीताचा प्रयोग झाला ते मार्गी संगीत होय. दुसरा संकेत रत्नाकराच्या प्रबन्धाध्यायात मिळतो –

१. संगीत बोध – डॉ. शरच्चन्द्र परांजपे, पृ. क्र. ३,४.

रञ्जकः स्वरसंदर्भो गीतमित्यभिधीयते।
गान्धर्वगानमित्यस्य भेदद्वयमुदीरितम् ॥
अनादिसम्प्रदायं यद्गान्धर्वैः सम्प्रयुज्यते।
नियतं श्रेयसो हेतुस्तद्गान्धर्वं जगुर्बुधाः॥
यत्तु वाग्गेयकारेण रचितं लक्षणान्वितम्।
देशीरागादिषु प्रोक्तं तद्गानं जनरञ्जकम् ॥

म्हणजेच रंजक स्वराला गीत म्हणतात. याचे दोन प्रकार गांधर्व व गान. ज्या गीताचा अनादिकालापासून प्रचार आहे; ज्याचा गांधर्व लोक प्रयोग करीत; जे नियत आहे, आणि ज्याचा हेतू मोक्ष आहे, त्या गीताला बुद्धिमान लोक गांधर्व म्हणतात. ज्या गीताची रचना वाग्गेयकार करतात; जे लक्षणांनी युक्त असते; ज्याचा देशी रागांत प्रयोग होतो आणि जे जनरंजक असते त्याला गान म्हणतात.




या श्लोकांवर टीका करताना कल्लिनाथ म्हणतात की, "गांधर्वं मार्गः। गानं तु देशीस्वगानमात्रम्। अनादिसम्प्रदायमित्यनेन गान्धर्वस्य वेदवदपौरुषेयत्वमपि सूचितं भवति। गानं तु वाग्गेयकारादि परतन्त्रत्वात्पौरुषेयमेव।" अर्थात् गांधर्व आणि मार्गी संगीत हे एकच आहे. गान म्हणजेच देशी संगीत. 'अनादि संप्रदायं' यापासून असे सूचित होते की, गांधर्व गीत अपौरुषेय आहे. तर गान हे वाग्गेयकारांवर आधारित आहे, त्यामुळे ते पौरुषेय.

शार्ङ्गदेवांनी सांगितले की, संगीत ही क्रियात्मक कला आहे, म्हणून क्रिया (लक्ष्य) व शास्त्र (लक्षण) यांत जिथे विरोध असेल, तिथे लक्ष्य म्हणजेच क्रियेला जास्त प्राधान्य देण्यात येईल.

यद्वा लक्ष्यप्रधानानि शास्त्राण्येतानि मन्वते।
तस्माल्लक्ष्यविरुद्धं यत्तच्छास्त्रं नेयमन्यथा॥

'एतानि शास्त्राणि' यावर कल्लिनाथाची अशी टीका आहे— 'देशीविषयाणीत्यर्थः' म्हणजे देशी संगीतात लक्ष्य (क्रिया), प्रधान आहे.

देशी संगीतातच जनरुचीप्रमाणे क्रिया बदलत राहते. जेव्हा क्रिया बदलते, तेव्हा क्रिया आणि शास्त्र यात साहजिकच फरक पडतो. म्हणून शास्त्र व क्रिया यांत सामंजस्य राहण्यासाठी क्रियेच्या अंगापुरते त्या शास्त्रांत उचित परिवर्तन केले जाते. कल्लिनाथाच्या 'शास्त्राविषयाणि' चे 'देशीविषयाणि' असा अर्थ करण्यामुळे स्पष्ट होते की, देशी संगीतच क्रियाप्रधान आहे, मार्गी संगीत नाही. मार्गी संगीतातील क्रिया- अंग हे जनरुचीप्रमाणे बदलत नाही. त्याचे लक्ष्य (क्रिया) लक्षणाशी (शास्त्र) इतके नियंत्रित असते की, त्यात परिवर्तन होतच नाही.



मतंग मुनी म्हणतात - "आलापादिनिबद्धो यः स मार्गः प्रकीर्तितः। आलापादिविहीनस्तु स च देशी प्रकीर्तितः।" यावरून स्पष्ट होते की, मार्गी संगीतात आलापादि नियम होते, परंतु देशी संगीतात नव्हते.

कल्लिनाथाने देशी संगीताबाबत असे म्हटले - 'देशित्वं च तत्तद्देशमनुजमनोरञ्जकत्वेन कामचारप्रवर्तितम।' अर्थात देशी संगीत तेच आहे की ज्याचा उद्देश भिन्न देशांतील लोकांचे मनोरंजन करणे असा आहे. ते नियमबद्ध नाही. ते, लोक आपआपल्या इच्छेनुसार गातात- वाजवतात.


संगीत रत्नाकरातील पहिल्या अध्यायात २२ व्या श्लोकात 'देशी' या शब्दावर टीका करताना कल्लिनाथाने म्हटले आहे की, - देशीति, देशशब्देन तत्रत्या जना लक्ष्यन्ते तैर्यथेच्छं क्रियमाणायां गीतादि क्रियायामाचार्यकृता संज्ञा। यात 'यथेच्छं' चा अर्थ आपल्या इच्छेप्रमाणे गीत गाइले जाते, ज्याला विशेष नियम नाहीत, ते देशी संगीत होय.

वैदिक संगीताच्या आधारावर आलाप, अलंकार इ. गोष्टींनी समृद्ध होऊन संगीताचा जो उत्कृष्ट विकास झाला, त्यालाच प्राचीन काळी मार्गी संगीत म्हणत. अर्थात् गांधर्व संगीतच मार्गी होते. वैदिक काळांत सामगानाव्यतिरिक्त संगीताचे

मर्मज्ञ, गांधर्व संगीताच्या स्वतंत्र कलेच्या रूपात प्रयोग करीत. त्यामुळेच गांधर्व हे नांव प्राप्त झाले.

गांधर्व संगीताची व्याख्या भरताने अशा प्रकारे केली आहे — 'प्रितिकारं पुनः गन्धर्वाणां च यस्मादधि गांधर्वमुच्यते।' ज्या संगीताबद्दल गांधर्वांना प्रेम वाटत होते, त्याला गांधर्व म्हटले. त्यावेळच्या शास्त्रीय संगीताला गांधर्व वेद म्हणत. वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की, गांधर्व संगीतच मार्गीसंगीत होते.

भरताने नाट्यशास्त्रातील २८व्या अध्यायांत गांधर्व लक्षण याप्रकारे दिले आहे —



यत्तु तन्त्रीकृतं प्रोक्तं नानावाद्यसमाश्रयम्।
गान्धर्वमिति तज्ज्ञेयं स्वरतालपदात्मकम्॥

अर्थात जे गीत तारवाद्यांबरोबर गाइले जाते, ज्यात निरनिराळ्या वाद्यांचा समावेश असतो, जे स्वर, ताल, पदांनी युक्त आहे ते गांधर्व संगीत होय.

मतंगाने देशी संगीताचे खालीलप्रमाणे वर्णन केले — 'येषां श्रुतिस्वरग्रामजात्यादि नियमो नास्ति।' म्हणजे ज्यांत श्रुती, स्वर, ग्राम, जाति इत्यादींसाठी नियम नाहीत, ते देशी संगीत. आणि म्हणूनच ज्यांत हे सर्व नियम आहेत, ते मार्गी संगीत.

लोक आप आपल्या आवडीनुसार, कोणत्याही नियमांशिवाय जे गीत गात, त्याला देशी संगीत म्हणत. कालांतराने या गीतांमध्ये स्वर, ग्राम, ताल इत्यादी नियम समाविष्ट झाले. आणि याचेच परिवर्तन देशी रागांत झाले. म्हणून आलाप, तान, अलंकारांनी युक्त स्वरलयीत व्यवस्थित गान हे आधुनिक काळातील 'मार्गी संगीत.' तर नियमांचे बंधन नसलेले, केवळ मनोरंजनासाठी, स्वेच्छेने जे गाइले जाते त्याला आपण 'देशी संगीत' म्हणू शकतो.


प्राचीन व आधुनिक मार्गी संगीताच्या भेद –

प्राचीन काळातील मार्गी संगीत षड्ज, गांधार व मध्यम ग्रामात असे. तर आधुनिक मार्गी संगीत ज्याला काही ठिकाणी देशी राग म्हटले आहे, ते केवळ षड्ज ग्रामातच आहे. पंडित रामामात्याने 'स्वरमेलकलानिधी' या ग्रंथात देशी रागाचे लक्षण खालीलप्रमाणे सांगितले –

देशीरागाश्च सकला: षड्जग्रामसमुद्‌भवा: ।
ग्रहांशन्याससमन्द्रादि षाडवौडवपूर्णका: ॥

म्हणजे सर्व देशी राग षड्ज ग्रामाशी मिळतात. प्रत्येक रागाचे ग्रह, अंश, न्यास असतात. व रागाचे तीन प्रकार असतात. औडुव, षाडव व संपूर्ण. यावरून स्पष्ट होते की, ग्रह, अंश, न्यास; षाडव; औडुव; संपूर्ण इत्यादि आधुनिक मार्गी संगीताचीही लक्षणे आहेत. फरक एवढाच की प्राचीन मार्गी संगीत केवळ षड्ज ग्रामातच असावे हे आवश्यक नव्हते.

प्राचीन काळातील मार्गी संगीत वीणा इत्यादी वाद्यांबरोबरच गाइले जाई. आजच्या मार्गी संगीताला वीणा आवश्यक नाही, तर ते केवळ तानपुऱ्याच्या साथीनेच गाइले जाते.



प्राचीन काळी मार्गी संगीतातील गीते छन्दोबद्ध होती आज नाहीत. त्याचप्रमाणे प्राचीन काळी मार्ग संगीत शास्त्रप्रधान होते तर आज क्रियाप्रधान आहे.

यावरून स्पष्ट होईल की, प्राचीन काळी ज्याप्रमाणे मार्गी व देशी संगीत होते ते आजही म्हणजे आधुनिक काळातही अस्तित्वात आहे. फक्त दोघांच्या स्वरूपात बदल आहे. केवळ त्या त्या वेळेनुसार मार्गी संगीताचे आदर्श व लक्षणे यांत भेद राहिला. आजचे शास्त्रीय संगीत हेच मार्गी संगीत होय. आणि उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत हे देशी संगीत होय.

ठाकुर जयदेवसिंह यांचे मत असेच आहे की, मार्ग व

देशी संगीत हे प्रकार संगीतात नेहमीच राहतील कारण [illegible] व साधारण लोकांच्या संगीतात नेहमीच फरक असतो. आणि मार्गी संगीत व देशी संगीत याचेच प्रतीक आहे.[1]

बा. गं. आचरेकर यांनी आपल्या 'भारतीय संगीत व संगीतशास्त्र' या पुस्तकांत असे लिहिले आहे –
त्यांनी मार्गी व देशी संगीताचे वर्णन करताना घराण्यांचा उल्लेख केला, तो असा –

मार्गी देशीति तद् द्वेधा तत्र मार्गः स उच्यते ।
यो मार्गितो विरिञ्च्याद्यैः प्रयुक्तो भरतादिभिः ॥

गायनात मार्गी व देशी असे दोन प्रकार आहेत. जो मार्ग वा जी विशिष्ट पद्धती ब्रह्मदेवांनी आचरिली, प्रचारिली ते मार्गी संगीत.

देशे देशे जनानां यद्रुच्या हृदयरञ्जकम् ।
गानं च वादनं नृत्यं तद्देशीत्यभिधीयते ॥

जनरुचीनुसार त्यांच्या हृदयाला प्रसन्न करणारे गीत, वादन व नृत्य यांना देशी संगीत म्हणतात.

प्राचीन काळी वेदऋचांचे गायन ऋषिमुनी करीत व ऋषिमुनीच ऋचांचे रचनाकारही होते. म्हणजेच सांप्रत जशी घराणी मानली जातात, तशी प्राचीनकालीही होती.

त्यांनी रचनाकारांची नावे खालीलप्रमाणे दिली आहेत –

अङ्गिरस – अङ्गिरसां सामभिस्स्तूयमानाः ।
अंगिरसांच्या सामांनी स्तवले जाणारे, असा उल्लेख ऋग्वेदांत आहे.

भारद्वाज – बृहत् सामाचे रचनाकार.

वसिष्ठ – रथन्तर सामाचे रचनाकार. आता ह्या अस्तित्वात नाही.[2] अर्थात या रचनाकारांचा संप्रदाय किंवा परंपरा निर्माण झाली असे म्हणता येईल.


---

१. मार्गी आणि देशी संगीत – श्री. ठाकुर जयदेवसिंह, लक्ष्यसंगीत – जून १९५७.
२. भारतीय संगीत व संगीतशास्त्र – बा. गं. आचरेकर, पृ. क्र. १८६.

# प्राचीन काळ

वैदिक काळानंतर प्राचीन काळामध्येही पुराणांतून संगीताचे उल्लेख सापडतात. तैत्तिरीय उपनिषद्, ऐतरेय उपनिषद्, शतपथ ब्राह्मण इत्यादी ग्रंथात संगीताबद्दल मार्गदर्शन केले आहे. याशिवाय याज्ञवल्क्य रत्नप्रदीपिका याही ग्रंथांतून संगीताचा परिचय होतो. सांख्य, प्रतिसांख्य या ग्रंथातही संगीताच्या उल्लेख आहे. हरिवंश पुराणात सप्तस्वर, ग्रामराग, सप्तकाची तीनही स्थाने, मूर्च्छना, नृत्य, नाट्ये व वाद्ये यांचे वर्णन आहे. वायुपुराणात संगीताची माहिती आहे. वीणा, दर्दुर, पणव, मृदंग, देवदुन्दुभी इत्यादी वाद्यांचा उल्लेख आहे.[1]

विख्यात इतिहासकार 'जीवोतन्यका' यांनी आपले पुस्तक 'The Depth of The Indian culture' यात लिहिले आहे की, पौराणिक काळातील जनता बैलगाड्यांच्या संगीतमयी स्पर्धेत भाग घेत असे. संगीतमयी म्हणजे गाडीला बैल जोडत, व त्या बैलांच्या गळ्यांत घुंगरे बांधत. ज्यात संगीताच्या खुल्या रीतीने प्रयोग होत असे, अशा सार्वजनिक उत्सवांची संख्या पहिल्यापेक्षा वाढली होती. त्या युगातील स्त्रिया संस्कृत मंत्रांचे उच्चारण सुंदर रीतीने करीत. हे मंत्र वाद्यांच्या सहाय्याने गाइले व वाजविले जात. गायक श्रोत्यांची आवड जाणत.[2]



या काळात सार्वजनिक संगीत शिक्षणाची व्यवस्था होती, परंतु संगीत शिक्षणाची केंद्रे अधिक नव्हती. पौराणिक काळातील लोकांचा असा विश्वास होता, की आत्मोत्थानासाठी संगीत हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे. त्याचप्रमाणे त्यांची अशीही समजूत होती की, मोक्षप्राप्ती संगीताशिवाय होऊ शकणार नाही.

हरिवंश आणि अन्य अनेक पुराणांमध्ये (मार्कण्डेय, वायु-पुराण, विष्णुपुराण), संगीताचे विस्तृत वर्णन मिळते.

---


१. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी, पृ. क्र. ८६.

२. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी, पृ. क्र. ८४-८५

मार्कण्डेय पुराणात षड्जादी सात स्वर, पांच प्रकारचे ग्राम राग पांच प्रकारचे गीत, मूर्च्छना, ५१ प्रकारच्या ताना, तीन ग्राम इ. माहिती मिळते. वाद्यांच्या रूपात वीणा, दर्दुर, पणव, मृदंग, देव-दुन्दुभी इत्यादी आढळतात.[1]

प्राचीन काळास 'जातिगायनाचा कालखंड' असेही म्हणतात. याचाच अर्थ या काळापर्यंत जातिगायन सुरू झाले होते याबद्दल श्रीमद्वाल्मीकिरामायणम् च्या बालकाण्डातील चौथ्या सर्गात उल्लेख मिळतो –

पाठ्यं गेयं च मधुरं प्रमाणैस्त्रिभिरन्वितम् ।
जातिभिः सप्तभिर्बद्धं तन्त्रीलयसमन्वितम् ॥



अर्थात गायन मधुर असावे, तीन्ही प्रमाणांनी किंवा लयींनी (विलंबित, मध्य, द्रुत) सात जातिंनी युक्त असावे, वीणेच्या लयीबरोबर मिळालेले असावे.


महाभारत हे वेदव्यासांनी रचले. हे महाकाव्य बौद्ध कालापूर्वीच लिहिण्यात आले. या युगात श्रीकृष्ण संगीताचा महान पंडित होऊन गेला. महाभारत या ग्रंथात जवळपास एक लाख श्लोक आहेत, आणि ते सर्व गेय आहेत. यातील प्रत्येक श्लोक गाइला जाऊ शकतो, हाच या श्लोकांचा विशेष गुण. महाभारत या ग्रंथात ठिकठिकाणी संगीताचे उल्लेख सापडतात. त्याचप्रमाणे या काळात सप्तस्वर स्पष्टपणे आढळतात. अर्थात – षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद इत्यादी.[2]

---

१. भारतीय संगीत का इतिहास – उमेश जोशी, पृ. क्र. ८६-८७.
२. प्राचीन भारत में संगीत – धर्मा श्रीवास्तव, तृतीय अध्याय – महाभारत में संगीत. पृ. क्र. ६३ ते ८१.

## ग्रंथ व ग्रंथकार-

प्राचीन काळांत अनेक संगीत ग्रंथकार होऊन गेले. भरताने नाट्यशास्त्र हा ग्रंथ याच काळात लिहिला. या ग्रंथाचा कालनिर्णय इ. स. पूर्व ३०० किंवा इ. स. नंतर ३०० असा मानला जातो. नाट्यशास्त्रात नाट्याव्यतिरिक्त संगीत, त्यातल्या त्यात संगीताचे शास्त्र विचारात घेतले आहे. भरतपूर्व ग्रंथात स्वरशास्त्र विशेषत्वाने फोड करून सांगितलेले नाही. हिंदुस्थानी गायकीचा मूलभूत पाया जो स्वरसंवाद व स्वरांतर्गत श्रुती यांची फोड भरताने केली आहे. व ती अत्यंत महत्वाची आहे. याचे कारण असे की, भरतानंतरच्या सर्वच ग्रंथकारांना ती मार्गदर्शक झाली आहे. नाट्यशास्त्र हा ग्रंथ नाट्याची चर्चा करणारा असला तरी भरताने त्यांत तत्कालीन संगीतशास्त्राची चर्चा केली आहे.




नाट्यशास्त्र या ग्रंथात एकूण ३६ अध्याय आहेत. यांतील २८ ते ३३, हे ६ अध्याय संगीताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. २८ वा अध्याय हा स्वरशास्त्रदृष्टीने अत्यंत महत्वाचा. या अध्यायात चर्चिलेले आहे. तंत्रीतून निर्माण होणारे स्वरमंडल, स्वर, श्रुती, ग्राम, मूर्च्छना, षड्ज व मध्यम ग्राम मिळून २२ श्रुती, मूर्च्छनांची नावे, स्वरसाधारण, जातिसाधारण, अंतरकाकली, कैशिकसाधारण, अविनाशी मध्यम, मंद्र, मध्य, तार, न्यास, अपन्यास, ग्रह, अंश, अल्पत्व, बहुत्व इत्यादींचा ऊहापोह आहे. त्याचप्रमाणे वादनविधी, वादनकला, लय, विविध तालांचे विवरण, गायकांचे गुणदोष इत्यादी संगीतविषयक माहिती सुद्धा आहे. भरताने सारणाचतुष्टयीचा प्रयोग करून प्रमाण श्रुती शोधून काढली. भरताच्या काळात जातिगायन प्रचारांत होते, त्याकाळी रागगायन नव्हते.

भरताने आपल्या ग्रंथात अलंकारांनंतर 'गीति' हे लहानसे पण महत्वाचे प्रकरण दिले आहे. कारण ते तत्कालीन भारतीय संगीताच्या स्वरूपाची स्पष्ट कल्पना देते.

गीति म्हणजे गायकीची पद्धती होय. कोणतेही

जातिगीत घेतले तरी ते चार प्रकारांनी व्यवस्थित व अलंकार युक्त गाइले असता रसभरित होते. प्राचीन भारतीय संगीतज्ञांच्या अनुभवाने या चार गीति, म्हणजे एकच गीत म्हणावयाच्या चार पद्धती प्रचारात आल्या. त्या म्हणजे मागधी, अर्धमागधी, संभाविता व पृथुला.[1]

आपण आत्ताच पाहिले की, गीति म्हणजे गायकीची पद्धत. यालाच आपण शैली असेही म्हणू शकतो. म्हणजे त्या काळीही जातिगायन करण्याच्या चार शैली किंवा पद्धती किंवा गीति प्रचारांत होत्या. या जातिगायनाच्या अंतर्गत जी पदे गाइली जात, त्यांना ब्रह्मप्रोक्तपद म्हणत. या पदांमध्ये भगवान शंकराची स्तुती असे. याशिवाय वेगळी पदे सुद्धा गाइली जात. हळू हळू [illegible] शतकानंतर जातिगायनांतर्गतच प्रबंध प्रकार निर्माण झाले. यांना आपण प्राचीन प्रबंध प्रकार असे म्हणू. प्रबंध म्हणजे गीतप्रकार. विद्वानांच्या मते हे गीतप्रकार नाट्यशास्त्रामध्ये वर्णिलेल्या ध्रुवा गीतांचे विकसित रूप आहे. हे प्रबंध प्रकार [illegible] शतकाच्या अंतिम कालापर्यंत भारतात प्रचारात होते.



## मतंगकृत बृहद्देशी

या ग्रंथात रागांचा उल्लेख सर्वप्रथम आढळतो. यांनी आपल्या ग्रंथात विशद केले आहे की, गीतिंचे पांच भेद होते. त्यांची क्रमाने शुद्धा, भिन्ना, गौडी, वेसरा, साधारणी अशी नावे होती. भरताने नाट्यशास्त्रात वर्णिलेल्या गीतिंपेक्षा मतंगाची नावे भिन्न दिसतात. मतंगाने वर्णिलेल्या गीतिंप्रमाणेच पुढे धृपदगायनाच्या वेळी वाण्या निर्माण झालेल्या दिसतात.

प्राचीन काळामध्येच महर्षि नारदांचे नारदी शिक्षा व संगीत मकरंद हे दोन ग्रंथ आढळतात. नारदी शिक्षेत वैदिक


---

१. भारतीय संगीत भाग १ला - प्रो. कृष्णराव गणेश मुळे, पृ. क्र. १७८ ते १८०.

स्वरांचे सूक्ष्म पण विस्तारपूर्वक वर्णन आहे. सामवेदिक सप्तस्वर आणि संगीतातील सात षड्जादिक् स्वर यांचा मेळ यात दर्शविला आहे.

यांच्या 'संगीत मकरंद' या ग्रंथात सर्वप्रथम पुरुष राग, स्त्री राग व नपुंसक राग यांचे वर्गीकरण आढळते. त्याचप्रमाणे त्यात रागांच्या जाति (औडुव, षाडव, संपूर्ण) व रागांचे गानसमय देखील सांगितले आहेत.

## मोंगल काळ किंवा मध्यकाळ -




स्थूलमानाने मध्यकाळ हा इ.स ८०० ते १८०० असा मानला जातो. ह्यातील १००० ते १८०० हा काळ खास मोंगल म्हणजेच मुस्लिम काळ होय. कारण इतिहासाच्या नोंदीप्रमाणे मोगलांचे आगमन भारतात ११ व्या शतकात झाले.

हर्षवर्धनानंतर संपूर्ण देशावर सत्ता ठेवू शकणारा राजा निर्माण न झाल्याने अनेक राज्ये निर्माण झाली. परंतु त्या सर्वांची शक्ती आपआपसात लढण्यातच वाया गेली. साहजिकच हे राजे युद्धामध्येच रस घेऊ लागले. युद्ध प्रिय झाल्यामुळे संगीताच्या आध्यात्मिक सौंदर्याचा रसास्वाद घेण्यासाठी त्यांना वेळच मिळत नव्हता. त्यावेळची राजकीय परिस्थिती निराशा-जनक होती. कोणत्याही कलेची प्रगती ही शांततेच्या काळातच होत असते. परंतु त्यावेळी राज्यांमध्ये स्थैर्य नव्हते. सतत युद्धे सुरूच होती. कोणालाच मानसिक शांती नव्हती. त्यामुळे स्वाभाविकच या सर्व गोष्टींचा परिणाम संगीत कलेवरही झाला. परंतु या काळांत संगीताला राजाश्रय नव्हता, असे म्हणता येणार नाही. पण जेवढा हवा होता, तेवढा नव्हता. त्याचा परिणाम असा झाला की, संगीत हे अनेक वर्गांमध्ये वाटले गेले. प्रत्येक वर्ग आप आपल्या रुचीप्रमाणे संगीताचा विकास करू लागला. यातूनच हळूहळू निरनिराळी घराणी निर्माण व्हायला सुरुवात झाली.

किंवा त्यांची पार्श्वभूमी निर्माण झाली असे म्हणता येईल. एक कलाकार दुसऱ्या कलाकाराला तुच्छ लेखू लागला.

अशी परिस्थिती असूनही आपण ठामपणे असे म्हणू शकणार नाही की, त्या काळच्या राजे महाराजांना संगीतात रस नव्हता. किंबहूना त्यांच्या दरबारात अनेक संगीतज्ञांना, गायक-वादकांना व इतर कलाकारांना सुद्धा राजाश्रय मिळालेला असे. ते त्यांचे सत्कारही करीत असत. शिवाय विशेष प्रसंगी संगीत सभांचे आयोजन केले जात असे.

याच काळात म्हणजे १२ व्या शतकाच्या उत्तरार्धात जयदेव कवीने 'गीत गोविंद' या श्रवणमधुर काव्याची रचना केली. जयदेव कवी स्वत: संगीतज्ञ होते. ह्या काव्यात राधा व कृष्ण संबंधित प्रबंध गीते आहेत. गीत गोविंद हे प्रबंधांचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. या ग्रंथातील प्रत्येक अष्टपदीसाठी राग व तालांचा निर्देश केलेला आढळतो. यावरूनच यावेळेपर्यंत जाति-गायनांचा लोप होऊन रागगायन प्रचारात आले होते असे वाटते.




या काळात भारत सर्व दृष्टीने समृद्ध होता. साहजिकच परकीयांची नजर भारताकडे वळली व भारतावर अनेक आक्रमणे झाली. इ.स. १००१ ते १०३० पर्यंत महम्मद गझनीने भारतावर विशेषत: उत्तरेकडे अनेक स्वाऱ्या केल्या, व अगणित लूट केली. पृथ्वीराज व जयचंद यांच्या कलहातून महंमद घोरीचा प्रवेश झाला. आणि तेव्हापासूनच भारतात मुसलमान स्थायिक होऊ लागले कुतुबुद्दीन ऐबक, सैय्यद लोदी इत्यादींनी उत्तरेत राज्ये स्थापित केली. भारतात इ.स. ११९१ ते १५२६ हा मोठा कालखंड अशांततेचा गेला. व त्यामुळे इतर कलांच्या बरोबरच संगीत कलेचीही प्रगती खुंटली.

परंतु ह्या काळात दक्षिणेत मात्र शांतता नांदत होती. इ.स. १०१३ मध्ये महम्मद गझनीने काश्मीरवर आक्रमण केले होते. त्यामुळे तिथे भारतीय विद्वानांचा आदर, मान, प्रतिष्ठा पहिल्या सारखी राहिली नाही. ते पूर्वीसारखे स्वतंत्रतेने आपली उपजीविका

करू शकत नव्हते. त्यामुळे तेथील विद्वानांनी दक्षिणेसारख्या शांत भागात आश्रयासाठी प्रस्थान करण्यास सुरुवात केली. त्यामुळे उत्तरेकडील अभिनवगुप्तासारख्या विद्वानांची परंपरा समाप्त व्हायला लागली.

याच वेळी पंडित शार्ङ्गदेवांचे पितामह (आजोबा) भास्कर यांनी देखील काश्मीर सोडले. त्यांनी दक्षिणेत देवगिरीचा आश्रय घेतला. शार्ङ्गदेवांचे वडील, सोढल यांचा जन्म तेथेच झाला. व ते दक्षिणेचे यादव नरेश भिल्लम यांच्या दरबारात आश्रित म्हणून राहू लागले. पुढे इ.स. १२१० ते १२१७ या काळात पंडित शार्ङ्गदेव भिल्लमचा पुत्र सिंहण याच्या राजसभेत पंडित म्हणून राहिले.

याच काळात 13 व्या शतकाच्या उत्तरार्धात पंडित शार्ङ्गदेवांनी 'संगीत रत्नाकर' ग्रंथ लिहिला. संगीत रत्नाकर हा ग्रंथ भारतीय संगीत व शास्त्रावरील प्रमाणग्रंथ मानला जातो. ह्या ग्रंथात शार्ङ्गदेवांनी श्रुती, नाद, स्वर, ग्राम, मूर्च्छना, जाती त्याचप्रमाणे ग्राम राग, गायकाचे गुणदोष, प्रबंध, वाद्य, नृत्य, नाट्य यांची विस्तृत चर्चा केली आहे. आजही दक्षिणेकडील व उत्तरेकडील विद्वान संगीत रत्नाकरास आधारग्रंथ मानतात.




याप्रमाणे दक्षिणेत बरीच शांतता असल्यामुळे तेथे संगीत कलेचा विकास होत राहिला. या काळात विजयनगरचे (यादवांचे) प्रबळ राज्य होते. या राज्यांत गायन, वादन व नृत्य या तीनही कलांना बहर आला होता. पुढे मुसलमानांनी विजयनगर व देवगिरी ही राज्ये बुडविल्याने संगीत शास्त्र पुन्हा पोरके झाले. अशा प्रकारे भारतावर मुसलमानांची आक्रमणे सतत होत राहिल्याने लोकांचे जीवन कष्टमय झाले होते.

मुसलमानांनी आपल्या बरोबर अनेक कलाकारांना देखील आणले होते. ते त्यांचाच आदर सत्कार करीत. परंतु ते भारतीय संगीताची स्तुती देखील करीत. यावेळेपर्यंत भारतीय संगीत शास्त्रावरील ग्रंथ संस्कृत मध्ये लिहिले गेले होते. मुसलमानांना ते समजत नसले तरी त्यांनी गायन वादनात बरीच प्रगती केली.

रामदेवराव यादव यांच्या राजवटीत संगीत कलेला उत्तेजन मिळाले. पण पुढे देवगिरीचा यादव वंश १३ व्या शतकात नष्ट झाला. त्यावेळी मुसलमानांचे जे आगमन झाले, ते बराच काळ राहिले. आणि त्यांचीच राजसत्ता निर्माण झाली.

१३ व्या शतकाच्या उत्तरार्धात अलाउद्दीन खिलजी राज्य करीत होता. १२९४ मध्ये अलाउद्दीन खिलजी देवगिरीवर चालून गेल व त्याने यादव राज्य नष्ट केले, आणि आपले राज्य स्थापित केले. दिल्लीचे शासनही खिलजीच्या हातात आले. याच काळात संगीत कलेची खूप प्रगती झाली.

अलाउद्दीन खिलजीच्या दरबारात अमीर खुसरो नावाचा एक सरदार उत्तम संगीतज्ञ होता. तो विद्वान, गुणग्राहक व कलावंत होता. सुलतान स्वतः संगीतप्रेमी असल्यामुळे खुसरोला नेहमीच प्रोत्साहन मिळत गेले. त्याने भारतीय संगीतात बरेच फेरबदल केले. या वेळेपासूनच भारतीय संगीतात दोन पद्धती प्रामुख्याने दिसून येऊ लागल्या. मुसलमानांनी आपला तळ मुख्यत: उत्तर भारतात ठोकला. त्यामुळे पाशियन संगीताच्या भारतीय संगीताशी संघर्ष होऊन आपली उत्तर हिंदुस्थानी संगीत पद्धती प्रचारात आली. याच वेळेपासून उत्तर हिंदुस्थानी व दक्षिण हिंदुस्थानी अशा दोन पद्धती दिसून येऊ लागल्या.




या काळांतच मोंगल भारतात स्थायिक झाले. त्यांनी येथील अनेक गोष्टींबरोबर भारतीय संगीत देखील आत्मसात केले व त्यात स्वत:चीही भर घातली. तिचेच अवशेष आज आपल्याला घराण्यांच्या परंपरेत जतन करून ठेवलेले दिसतात.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की, अमीर खुसरो-मुळेच त्या काळी संगीताच्या दोन पद्धती अस्तित्वात आल्या. त्यामुळे अमीर खुसरोबद्दल थोडा इतिहास पाहणे आवश्यक आहे.

# अमीर खुसरो-

अमीर खुसरोचा जन्म इ.स. १२५३ मध्ये त्याचे वडील महमद सैफुद्दीन हिंदुस्थानात आल्यावर झाला. खुसरोने दिल्लीपती ग्यासुद्दीन बल्बन याच्या पदरी नोकरी धरली. काही वर्षांनी बल्बन घराणे लोप पावून खिलजी घराणे दिल्लीच्या तख्तावर आले. अर्थात खुसरो खिलजींच्याच पदरी राहिला.[1]

अलाउद्दीन खिलजीने १२९४ मध्ये देवगिरीवर स्वारी केली. त्यावेळी अमीर खुसरोही त्याच्याबरोबर होता. देवगिरीच्या यादवांच्या पदरी गोपाल नायक नावाचा विद्वान गवई होता. खिलजीने यादव वंश नष्ट केला. दिल्लीला परत जातांना खुसरोने गोपाल नायकाला बरोबर नेले. त्याचे गाणे ऐकून व त्यात स्वतःची भर घालून त्याने भारतीय संगीतात अमूल क्रांती घडवून आणली. भारतीय संगीतामध्ये पर्शियन संगीताचे मिश्रण करून एक नवीनच संगीत प्रचारात आणले. दक्षिणेतील शुद्ध स्वरसप्तकाऐवजी निराळ्या शुद्ध सप्तकाची रचना केली. म्हणजेच आज जिला उत्तर हिंदुस्थानी संगीत पद्धती म्हणतात, तिचा उत्पादक, प्रवर्तक व प्रस्थापक अमीर खुसरो होय.



भारतीय संगीतात त्याने खालील बदल घडवून आणले. त्याकाळी सात शुद्ध व सात विकृत असे एकंदर चौदा स्वर होते. त्यामध्ये शुद्ध ऋषभ व शुद्ध धैवत यांना विकृती नाही, हे त्याच्या लक्षात येताच त्याने स्वरध्वनीत बदल न करता त्यांच्या नांवात बदल केला. याच स्वरांना नवीन नांवे देण्यामुळे त्याचे शुद्ध स्वरांचे सप्तक आजच्या काफी सारखे झाले. हे शुद्ध सप्तक १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत प्रचारात होते.

खुसरोने निर्माण केलेले राग - जीलफ, साजगिरी, सरपर्दा, यमन, रात की पुरीया, बरारी, तोडी, पूर्वी इत्यादी.

ताल - झूमरा, आडा चौताल, सूलफाक, पश्तो, फरोदस्त, सवारी इत्यादी.


---

1. भारतीय संगीत व संगीतशास्त्र - बा. गं. आचरेकर, पृ. क्र. ९०.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तत्कालीन विविध गायनप्रकारांचे वैशिष्ट्ये व सौंदर्य एकत्र करून त्याने ख्याल रचना केली. त्याच प्रमाणे गझल, कव्वाली, तराना, खमसा इत्यादींची रचना केली.

ही ख्याल गायकी आकर्षक होती तरीही तत्कालीन ध्रुपद धमारीय बाणेदार गायकांनी ती लगेच अंगीकारली नाही. कारण त्यावेळी ध्रुपदगायन पेन तारुण्यात होते, बहरात होते त्यामुळे ध्रुपदगायकांची एक तेजस्वी परंपराच निर्माण झाली होती.

तत्कालीन ध्रुपदगायकी ही भक्ती व शांत रसाचे प्रतीक होती. त्याचप्रमाणे समाजात, रसिक श्रोत्यांवर तिचा पगडा देखील भरपूर प्रमाणात होता. यामुळेच किंवा अन्य काही कारणांमुळे त्यावेळी ही ख्यालगायकी पुढे येऊ शकली नाही. काही कालांतर जौनपूरच्या सुल्तान हुसैन शर्कीने ख्यालगायकीचा प्रचार होण्यासाठी प्रयत्न केले. परंतु तो त्यात असफल झाला. पुढे अंदाजे ४०० किंवा ४५० वर्षांनी सदारंग व अदारंग यांनी ख्यालगायकी प्रचारात आणली. आणि ती गायकी आजपर्यंत सुरू आहे व दिवसेंदिवस लोकप्रियच होत आहे.




खुसरोने ख्याल कबारी या हिंदी, फारसी व अरबीच्या शब्दकोशाची रचना केली. खुसरोचे वैशिष्ट्य असे की, तो भारतीय राग एकून, नंतर त्यात फारसी मिश्रण करून एकवीत असे. अमीर खुसरो व गोपाल नायक दोघेही दरबारातील गायकच होते. पण गोपाल नायक हा अलाउद्दीन खिलजीच्या मांडलिक राजाच्या दरबारांत होता. त्यामुळे खुसरोने संगीतात जी काही क्रांती घडवून आणली तिला राजाश्रय मिळत गेला. त्यामुळे प्रचारही होत गेला. याप्रमाणे खिलजीच्या युगात भारतीय संगीताला फारसी साज चढला.

खुसरोने हिंदुस्थानी संगीतात नवे विचार व कल्पना यांचे सृजन केले. त्याने हिंदुस्थानी गेय पद्धती व पर्शियन मुकाम या दोन्हींचा मेळ केला. कव्वाली ही खुसरोची देण आहे. त्याचे शिष्य कव्वाल गायक म्हणूनच ख्यातनाम झाले. त्यांच्यात कव्वाल व कलावंत घराणी प्रसिद्ध झाली. कव्वाल मुस्लिम

भक्तिप्रधान गीते गात तर कलावंत सांसारिक सामाजिक गीते गात. हिंदुस्थानी व इराणी संगीत मिश्रणाने जे घराणे तयार झाले त्याला 'कव्वाल बच्चांचे घराणे' असे म्हणतात. पुढे ग्वाल्हेर घराणे याच घराण्यातून निर्माण झाले व ग्वाल्हेर घराण्यातून अनेक नवीन घराणी उदयास आली.

यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, ख्याल पद्धतीचे बीजारोपण अमीर खुसरोने केले, जौनपूरच्या हुसैन शर्कीने त्याचे संवर्धन केले आणि सदारंग- अदारंग यांनी महम्मदशाह रंगीलेच्या दरबारात राहून ख्यालगायनासाठी हजारो बंदिशी रचून त्यांचा प्रसार केला.



१४ व्या शतकात लोचन कवीने 'राग तरंगिणी' हा ग्रंथ लिहिला. त्याचप्रमाणे पंडित शार्ङ्गदेवाच्या 'संगीत रत्नाकर' या ग्रंथावर टीका करणारा ग्रंथ पंडित चतुर कल्लिनाथाने याच सुमारास लिहिला.

१५ व्या शतकातील जौनपूरचा बादशाहा सुल्तान हुसैन शर्की हा संगीतप्रेमी होता. याने ख्यालगायन लोकप्रिय करण्याचे बरेच प्रयत्न केले. परंतु त्यात तो असफल झाला. याच सुमारास दाक्षिणी संगीत विद्वान पंडित रामामात्याने 'स्वरमेलकलानिधी' हा दक्षिणी पद्धतीवरील ग्रंथ लिहिला.

पहिला मोंगल बादशाहा बाबर व त्याचा पुत्र हुमायूं यांना संगीताची आवड होती. परंतु अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे त्यावेळी संगीताला विशेष प्रोत्साहन मिळाले नाही.


यावेळेपर्यंत म्हणजे अर्थात अकबर सत्तेवर येण्यापूर्वी ग्वाल्हेरचा राजा मानसिंह तोमर याने ध्रुपद व धमार शैलीला राजाश्रय दिला. त्याच्या दरबारात अनेक गायक वादक होते.

१६ व्या शतकात अकबर (१५५६-१६०५) गादीवर आला. तो अत्यंत संगीतप्रेमी होता. त्याच्या काळात संगीताला राजाश्रय मिळाला. याच वेळी स्वामी हरिदास नावाचे महान संगीतज्ञ होऊन गेले.

पुढे प्रसिद्धीस आलेले तानसेन, नायक बैजू, रामदास, गोपाल, शौरसेन हे सर्व त्यांचे शिष्य होते.

अकबराच्या काळातच चार शैली किंवा चार बाण्या निर्माण झाल्या त्या खालीलप्रमाणे –
खंडार बाणी, नोहार बाणी, डागुर बाणी, गौडी बाणी.
या चारही बाण्यांचे प्रवर्तक अकबराच्या दरबारात होते. तानसेनाची गौडी बाणी, ब्रजचन्द -ची डागुर बाणी, राजा सम्मोरवन सिंह -ची खंडार बाणी व श्रीचन्दची नोहार बाणी.

अकबराच्या काळात धृपदगायन उच्च शिखरावर होते. तानसेनाने रबाब नावाचे वाद्य निर्माण केले. मंदिरातूनही भक्तिगीतांमुळे संगीतास लोकप्रियता मिळाली. हरिदास स्वामींनी कृष्णभक्तिपर अनेक गीते रचली. त्या काळात मीराबाई, सूरदास, तुलसीदास, कबीर इत्यादींनी अनेक भक्तिगीतांची रचना करून संगीताची आराधना चालू ठेवली. त्यामुळे समाजात एक प्रकारचे भक्तिपूर्ण वातावरण तयार झाले. आणि संगीत साहित्यातही भर पडली.




संगीताचे कलात्मक स्वरूप व शास्त्र यांची माहिती व जोपासना व्हावी या उद्देशाने अकबराच्या प्रोत्साहनाने पुंडरिक विठ्ठल या पंडिताने 'सद्राग चंद्रोदय, रागमाला, रागमंजरी, नृत्यनिर्णय' हे ग्रंथ लिहिले. याप्रमाणे अकबराच्या काळात कला, कलाकार व शास्त्र अशी तिहेरी प्रगती झाली.

अकबरानंतर जहांगीर व शहाजहान यांच्या कारकिर्दीतही संगीत कलेस राजाश्रय मिळाला. याच काळात सोमनाथकृत रागविबोध, हृदयनारायणकृत हृदयप्रकाश, दामोदरकृत संगीत दर्पण, अहोबलकृत संगीत पारिजात, इत्यादी ग्रंथ लिहिले गेले. त्याचप्रमाणे दक्षिणेकडील पंडित व्यंकटमखीने 'चतुर्दंडी प्रकाशिका' हा ग्रंथ लिहून १२ स्वरांच्या सप्तकातून ७२ थाटांची निर्मिती होऊ शकते, हे सिद्ध केले.

शहाजहान नंतर औरंगजेब गादीवर आला. पण त्या

काळात अशांतता होती. मराठे लोक हल्ले करीत. कलेची प्रगती होण्यासाठी जी राजकीय, सामाजिक शांतता हवी होती, ती नव्हती. छोटे मोठे राजेही आप आपसात बंड करून उठत. कलाकार कलेच्या नावाखाली व्यसनाधीन होऊ लागले. त्यामुळे औरंगजेबाने संगीतास कडाडून विरोध केला. संगीत ही चैनीची बाब असे सांगून त्याने संगीताच्या प्रचारास बंदी केली.

या काळात संगीताची प्रगती काहीशी खुंटल्यासारखी दिसत असली तरीही या काळात ग्रंथलेखन झाले. भावभट्ट या पंडिताने "अनूपसंगीतरत्नाकर, अनूपांकुश आणि अनूपविलास" हे तीन ग्रंथ लिहिले.



पंडित श्रीनिवासाने 'राग-तत्त्व-विबोध' हा ग्रंथ लिहिला. पुढे औरंगजेबानंतर सर्व मोंगल बादशहा राजकीय दृष्ट्या दुर्बल ठरले. पण त्यांनी संगीत कलेला आश्रय दिला. संगीत कलेवर हे त्यांचे उपकार फारच प्रशंसनीय आहेत.


१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात मोंगल वंशाच्या शेवटच्या बादशहा महम्मदशहा रंगीले हा आहे. त्याच्या दरबारात सदारंग-अदारंग हे महान कलावंत होते. यांनी हजारो ख्यालांची रचना करून अनेक शिष्य तयार केले. व हळू हळू ख्यालगानाचा विकास होऊन धृपदगायन मागे पडू लागले. याच काळात मिया शोरीने टप्पागायन लोकप्रिय केले.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात संगीत साधना चालूच होती. याच काळापासून ब्रिटिशांची भारतावर आक्रमणे सुरू होती. या काळातले मोंगल बादशहा हे विलासी वृत्तीचे असल्यामुळे त्यांची शक्ती हळूहळू कमी होत होती. अखेर इंग्रजांनी आपली सत्ता भारतामध्ये प्रस्थापित केली. यामुळे इंग्रजांचे मांडलिक या नात्याने अनेक छोटी मोठी संस्थाने निर्माण होऊन संगीतकला त्या त्या संस्थानिकांच्या आश्रयाने वृद्धिंगत होऊ लागली.

यामुळे घराणी निर्माण व्हायला नशीच पार्श्वभूमी निर्माण झाली, जशी सम्राट हर्षवर्धनानंतर झाली.

## आधुनिक काळ -

मोगलांच्या ऱ्हासानंतर म्हणजेच इ. स. १८०० नंतर ब्रिटिश भारतात आले. संपूर्ण सत्ता त्यांच्या हातात गेली. त्यामुळे भारतीय जनतेवर त्यांचा प्रभाव पडू लागला. या लोकांना भारतीय संगीतात रूची नसल्यामुळे साहजिकच भारतीय संगीताचा राजाश्रय तुटला. संगीत व कलाकारांची प्रतिष्ठा घसरली. सुशिक्षित समाजही पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यात धन्यता मानू लागला.




इंग्रजांनी नेहमीच भारतीय संगीताची उपेक्षा केली. त्यांनी भारतीय संगीत कलाकारांचा कधीच सन्मान केला नाही. त्यांनी भारतीय संस्कृतीकडे नेहमीच तिरस्काराच्या दृष्टीने पाहिले. त्यामुळे जे लोक पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करीत होते, ते देखील भारतीय संगीताकडे उपेक्षेने पाहू लागले. याचा परिणाम असा झाला की, गणिका व वेश्यांच्या हातात संगीतकला गेली. साहजिकच प्रतिमा ढाली. व चांगल्या घराण्यांतील व्यक्ती संगीताच्या संपर्कात येईनाशा झाल्या.

अशा परिस्थितीत जे काही थोडेफार संगीतज्ञ व संगीतकार उरले होते ते संस्थानिक राजांच्या आश्रयाने राहू लागले. त्यामुळे संगीत कलेला आश्रय केवळ संस्थानिक राजांच्या दरबारात राहिला. ज्या ज्या संस्थानिकांनी संगीताला राजाश्रय दिला. तेथे असलेल्या संगीतकारांनी आपले शिष्य व पुत्र यांच्या रूपाने आपल्या शैलीचा विकास केला. व यातूनच घराणे ही संज्ञा अस्तित्वात यायला सुरुवात झाली.

यावेळेपर्यंत ख्यालगायकी लोकप्रिय झाली होती. त्या काळी विद्येसाठी गुरूजवळ राहून अतिशय कष्ट करावे लागत. गुरूच्या लहरीप्रमाणे शिक्षण अशी स्थिती होती. त्याचप्रमाणे शास्त्र-नियमांकडे दुर्लक्ष झाल्याने एकच राग वेगवेगळ्या घराण्यांतून वेगवेगळ्या पद्धतीने गाइला जाऊ लागला. परंतु अशा परिस्थितीतही नामांकित कलाकार निर्माण होऊन कलेचा दर्जाही उंचावला.

परंतु निर्माण झालेल्या कलाकारांचे कौतुक करणारा समाज अस्तित्वात नव्हता. त्यामुळे संगीत कला विशिष्ट रसिकांपुरतीच मर्यादित होऊन बसली. नवीन शास्त्रीय ग्रंथ निर्माण होण्याची शक्यता तर दूरच, उलट असलेले ग्रंथ देखील नष्ट होण्याची भीती निर्माण झाली.




अशा परिस्थितीत संगीत कला व शास्त्र यांचा परस्पर संबंध निश्चित केला जावा या हेतूने जयपूरचे राजे प्रतापसिंग यांनी सर्व नामवंत गायकांची एक परिषद भरविली. व या परिषदेचा वृत्तांत 'संगीतसार' या ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला.

लखनौचे महम्मद रझा यांनी 'नगमाते आसफी' हा ग्रंथ लिहून राग वर्गीकरणाच्या नवीन पद्धतीचे प्रतिपादन केले. हळूहळू सुशिक्षित समाजाचे लक्ष संगीताकडे जाऊ लागले. याच काळात सुरेंद्र मोहन टागोर यांनी 'Universal History of Music' आणि 'Music From Various Authors' अशी दोन पुस्तके लिहून जुन्या व नव्या संगीताची माहिती देण्याचा प्रयत्न केला. रविंद्रनाथांनी शास्त्रीय संगीतातील बंदिशींच्या आधारावर बंगाली भाषेतील गीतांची रचना करून 'रविंद्र संगीत' नावाने एक शैली बंगालमध्ये प्रचारात आणली, जाणकारांनी तिचे स्वागतच केले.

या सर्व प्रयत्नांमुळे सुशिक्षित समाजात संगीताबद्दल प्रेम उत्पन्न होऊ लागले. सर्व प्रथम १९१६ साली बडोदयामध्ये एक मोठी संगीत परिषद झाली. यानंतर दिल्ली, बनारस इत्यादी ठिकाणी संगीत परिषदा होऊन गायकांमध्ये रागनियमांविषयी

आप आपसात चर्चा व विचारांची देवाणघेवाण होण्यास सुरुवात झाली. इतके होऊनही संगीत बहुजन समाजापर्यंत पोहोचले नव्हते असे खेदाने म्हणावे लागते. ही परिस्थिती पाहून पंडित विष्णू नारायण भातखंडे व पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी संगीत बहुजन समाजापर्यंत पोहचविण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. याद्दष्टीने त्यांच्या संगीतविषयक कार्याचा थोडा आढावा घेणे उचित ठरेल.

## पंडित विष्णू नारायण भातखंडे –




पंडित विष्णू नारायण भातखंडे यांचा जन्म १८६० मध्ये झाला. वास्तविक पाहता हे पेशाने वकील होते. परंतु यांना संगीत कलेविषयी इतकी आवड होती की आपल्या वकीलीच्या पेशा सोडून ते संगीताकडे वळले. त्यांनी सर्व भारतभर भ्रमण करून मोठमोठ्या कलाकारांची गाणी ऐकली व निरनिराळ्या घराण्यांच्या अनेक चीजा स्वरलिपीबद्ध करून 'हिंदुस्थानी संगीत पद्धती क्रमिक पुस्तक मालिका' या नावाच्या पुस्तकांत, ६ भागांत प्रसिद्ध केल्या. संगीताची शास्त्रीय माहिती देणारे 'हिंदुस्थानी संगीत पद्धती'चे चार भाग ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. त्यांनी संस्कृत भाषेत 'श्रीमल्लक्ष्यसंगीतम्' हा ग्रंथ लिहिला.

१९१६ मध्ये बडोदा येथे मोठे संगीत संमेलन भरले. त्याचे उद्घाटन बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव महाराज, गायकवाड यांनी केले. या संमेलनात पंडित भातखंडे यांची संगीत संबंधात जी भाषणे झाली ती इंग्रजी मध्ये, 'A Short Historical Survey of the Music of India' या पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली. त्याचप्रमाणे पंडित भातखंडे यांनी 'Comparative Study of the Systems of Music' हा ग्रंथ लिहिला. शिवाय त्यांनी १० थाटांमध्ये बहुतेक सगळ्याच प्रचलित रागांचे वर्गीकरण करून दाखविले.

## पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर —

पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांचा जन्म १८७२ मध्ये झाला. १८८७ साली अपघाताने त्यांचे डोळे अधू झाले व ते संगीताकडे वळले. त्यांनी संगीताचे शिक्षण बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्याकडे घेतले. मिरजेच्या वास्तव्यात समाजाकडून गायकांना दिल्या जाणाऱ्या मानहानिकारक वागणुकीची बरीच प्रचीति आल्याने विष्णू दिगंबर फार खिन्न झाले. गायकांपाशी असामान्य कला असूनही समाज त्यांच्याकडे हलक्या नजरेने पाहत असे. अर्थात या परिस्थितीला गायक-वादक देखील कारणीभूत होतेच. गायकाला सामाजिक मानमान्यता मिळवावयाची झाल्यास परिपूर्ण कलेबरोबर सदाचारी वर्तणूक, स्वाभिमान, लहरी - छांदिष्टपणाचा त्याग या गोष्टी गायकाने आत्मसात केल्या पाहिजेत. त्याचबरोबर ही संगीत विद्या सामान्य जनतेपर्यंत पोचल्याशिवाय कलाकारांची या वर्गाकडून प्रशंसा होणार नाही हे त्यांच्या लक्षात आले व त्या दृष्टीने त्यांनी आपले प्रयत्न सुरु केले.




पुढील पिढीचे संगीतकार निर्व्यसनी, सदाचारी, वकशीर निपजल्यास समाजाच्या कलाकारांबद्दलच्या विकृत कल्पना नाहीशा होतील. यासाठी सर्व प्रकारचे सर्वांगीण शिक्षण देणारी संस्था असावी हे जाणून त्यांनी १९०१ मध्ये लाहोर येथे 'गांधर्व महाविद्यालय' ही संगीत संस्था स्थापन केली. त्यांनी आपल्या शिष्यांकरवी भारतात ठिकठिकाणी गांधर्व महाविद्यालयांची स्थापना करून सर्व सामान्य श्रोत्यांची संगीताभिरुची वाढविली. तसेच संगीत शिक्षण जनतेस सुगम करून दिले.

आपल्या विद्यार्थ्यांना अनेक कलावंतांचे गायन-वादन ऐकावयास मिळून त्यांच्या कलेची वाढ व्हावी या दृष्टीने त्यांनी संगीत परिषदांचा उपक्रम सुरू केला. व अशा परिषदां-तून गायकांनी गायकांचा सन्मान करण्याची प्रथा त्यांनीच सुरू

केली. पूर्वी गाणी बजावणी दरबारात अगर काही खाजगी ठिकाणीच होत असत. सर्वसाधारण जनतेस त्याचा मागमूसही नसे. ही परिस्थिती पालटण्यास त्यांनी जाहीर जलसे करण्याची प्रथा सुरू केली व संगीत कलेच्या श्रवणाचा मार्ग जनतेस खुला करून दिला. अशा प्रकारे राजवाड्यात व उच्च वर्गात बंदिस्त असलेले संगीत बहुजन समाजापर्यंत पोहचविले.

यांप्रमाणे पंडित विष्णू नारायण भातखंडे व पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर या दोघांनी संगीताच्या बाबतीत अतुलनीय असे कार्य केले. दोघांनीही संगीताचा प्रचार व प्रसार आपआपल्या पद्धतीप्रमाणे केला. संगीताची रूची बहुजन समाजात निर्माण केली, व संगीत कलेला उच्च दर्जा मिळवून दिला.



स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही संगीताच्या प्रचार द्रुत गतीने होतच आहे. महाविद्यालयामध्येही संगीत आदी कलांचे शिक्षण मिळावयास लागले. एवढेच नव्हे तर त्यात पदवीही मिळावयास लागली. परंतु पूर्वीच्या तुलनेत असे अनुभवास येते की, सर्व सवलती उपलब्ध असूनही पाहिजे तसे कलाकार निर्माण होत नाहीत. कारण संगीताचे शिक्षण जरी मिळत असले तरी शिक्षणाचा स्तर घसरल्यासारखा वाटतो. पंडित पलुस्करांनी जेव्हा आपले कार्य सुरू केले तेव्हा अशी परिस्थिती होती की, कलाकार पुष्कळ होते, परंतु त्यांना ऐकणारा, त्यांच्या संगीत कलेचा आनंद लुटण्या इतपत प्रगत असलेला रसिक समाज उपलब्ध नव्हता. त्यामुळे पंडितजींनी संपूर्ण देशभर 'कानसेन' तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला, व त्यांचा तो प्रयत्न यशस्वीही झाला.

परंतु आजची परिस्थिती नेमकी विरूद्ध आहे. आज समाजात कानसेन भरपूर आहेत परंतु तानसेनांबद्दल काय? अर्थात त्या प्रमाणात कलाकार निर्मिती होत नाही. ही परिस्थिती पालटण्यास तशा धर्तीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयांमधून संगीत शिक्षण मिळते पण ते सामूहिक रित्या. संगीत ही मौखिक कला आहे. त्यामुळे गुरू-शिष्य परंपरा आवश्यक आहेच. पण एका वेळी एक किंवा दोन शिष्य आणि तेही सारख्या प्रकृतीचे.

त्याचप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षणपद्धतीचा जो अभ्यासक्रम आहे त्यात देखील बदल करावयास हवेत. शास्त्र व क्रिया या दोन्हींपैकी, ज्या विद्यार्थ्याला ज्यात आवड असेल त्याला तो विषय मिळावयास हवा. म्हणजे शास्त्र व कला यांत बरोबरीने प्रगती होऊ शकेल. तसेच कलावंत निर्मितीकरता प्रयत्न करावयास पाहिजेत.

